ID

# पहिली खबर
# FIRST INFORMATION REPORT

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता - २०२३ च्या कलम १७३ अंतर्गत (Under Section 173 B.N.S.S.-2023)

1. राज्य State महाराष्ट्र जिल्हा District मुंबई पोलीस ठाणे Police Station ला.प्र.वि पहिली खबर क्र. FIR No. 34 वर्ष Year 2024 दिनांक Date ........

2. (i) अधिनियम Act भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ कलमे Sections 7

(ii) अधिनियम Act ........ कलमे Sections ........

(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ........

3. (a) अपराधाची घटना : Occurrence of offence : वार Day गुरुवार तारीख पासून Date from 16/10/24 वेळ Time 11.00 तारीख पर्यंत Date to 30/10/24 वेळ Time ........

वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा (Tick applicable portion).

(1) ००.०० ते ०३.०० (2) ०३.०० ते ०६.०० (3) ०६.०० ते ०९.०० (4) ०९.०० ते १२.०० (5) १२.०० ते १५.००
(6) १५.०० ते १८.०० (7) १८.०० ते २१.०० (8) २१.०० ते २४.००

(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date 15/10/2024 वेळ Time 05.10 वा.

(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. 3 तारीख Date 31/10/2024 वेळ Time ........

4. माहितीचा प्रकार Type of Information ........ लेखी / तोंडी Written / Oral लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. ........ चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. Chouki / Beat / O. P. Name and No. ........

(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name बृहन्मुंबई महानगरपालिका ~~क्रमांक असल्यास~~ No. if any गल्ली Ward के / पुर्व वार्ड रस्त्याचे नाव Name of road अंधेरी मुंबई

जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place ........ गाव Village ........ पोस्ट Post ........ तालुका Taluka ........ जिल्हा Dist. ........ राज्य State ........

(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे. चे नाव In case, outside the limit of this Police Station ........ तालुका Taluka ........ जिल्हा Dist. ........ राज्य State ........

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.

(a) नाव Name श्री. गणपत परस्वाके (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name रघुनाथ परस्वाके

(c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age 44 वर्षे (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. 90494839...

(e) पारपत्र क्रमांक Passport No. ........ दिल्याचा दिनांक Date of issue ........ दिल्याचे ठिकाण Place of Issue ........ (f) व्यवसाय Occupation ........

(g) धर्म Religion ........ जात Caste ........ जनजात Sub-Caste ........

(h) पत्ता Address सी/61/14 गल्ली/सर्वे नं. Ward ~~घराचे नाव नं.~~ House Name No. ~~सोसायटी~~ फोन/मो. Phone No. सेक्टर 48 पॅन नं. Pan No. ........ वोटर्स नं. Card No. ........

रस्त्याचे नाव Road सिवुडस, जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place नवी मुंबई Village ........ पोस्ट Post ........ पो. स्टे. P. Stn. ........

तालुका Taluka ........ जिल्हा Dist. ........ राज्य State ........ सध्याचा पत्ता Present Address ........

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)

Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

अभिजीत सुदाम दिक्षीत वय 43 वर्ष पद दुय्यम अभियंता कार्यालय पत्ता- बृहन्मुंबई महानगरपालिका के/पुर्व वार्ड, अंधेरी मुंबई रा.ठि. फ्लॅट क्र 1001 टॉवर क्र ... ग्रसनाम विंग, सिंधी सोसायटी चेंबूर, मुंबई

याशिवाय फिर्यादी श्री गणपत रघुनाथ परखाके वय ४४ वर्षे धंदा नोकरी (पोलीस निरीक्षक ला.प्र.वि मुंबई) रा. डी सी/६/१४, गुरुदत्त सोसायटी, सेक्टर ४८-ओ, सिवूड्स नवी मुंबई यांच्या स्वतंत्र कागदावर नोंदविण्यात आलेली जबाब हाच गुन्ह्याच्या प्रथम खबरी अहवाल म्हणून संबोधण्यात येतो

समक्ष

(उमा गवळी)
सहाय्यक पोलीस आयुक्त
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
नवी मुंबई विभाग मुंबई

Received (FIR copy Received).
Kcheew 31/10/2025
Kalpita Sanjay Choudhary.

फिर्याद

दिनांक ३०/१०/२०२५

श्री. गणपत रघूनाथ परचाके वय ४४ वर्षे, धंदा : नोकरी (पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई) राठी : सी/६/१४, गुरुदत्त सोसायटी, सेक्टर ४८ अे, सिवुडस, नवी मुंबई मो.क्र. ९०४९५८३९५०.

---0000---

मी वरील प्रमाणे असून वर नमूद ठिकाणी माझे कुंटूबासह रहावयास आहे. मी दिनांक. ०७/०७/२०२३ रोजीपासून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे पोलीस निरीक्षक या पदावर नेमणूकीस आहे.

मी दिनांक. ३०/१०/२०२५ रोजी कर्तव्यावर असताना मला माझे वरिष्ठांनी समक्ष बोलावून एक तक्रारदार असून त्यांचेकडे लोकसेवक लाचेची मागणी करीत असलेबाबतची तक्रार त्यांनी दिनांक १५/१०/२०२५ रोजी दिली होती. सदर तक्रारीची पडताळणी करण्याकरीता पोलीस निरीक्षक गोकूळ बोरसे यांची पर्यवेक्षक अधिकारी म्हणून नेमणुक करण्यात आली होती. तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दिनांक १६/१०/२०२५ रोजी लोकसेवक लाचेची मागणी करीत आहे किंवा नाही? याची पडताळणी करण्यात आली असता, नमुद दिवशी लोकसेवक यांनी तक्रादार यांच्याकडे त्यांच्या कामाच्या मोबादल्यात लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले आहे. आज रोजी पर्यवेक्षक अधिकारी पोलीस निरीक्षक गोकूळ बोरसे हे काही कारणास्तव कार्यालयात नसल्याने त्यांचेऐवजी पर्यवेक्षक अधिकारी म्हणून आम्हास कर्तव्य करण्यास सांगितले.

त्यानुसार मी सपोआ उमा गवळी यांची कार्यालयात भेट घेवून त्यांचेकडे तक्रारीबाबत माहिती घेतली असता त्यांनी सांगितले की, ते दिनांक १५/१०/२०२५ रोजी कार्यालयात हजर असतांना मा. वरिष्ठांनी बोलवून तक्रारदार कु. कल्पिता संजय चौधरी यांचा परिचय करुन देवून त्यांना लोकसेवकाकडून लाचेची मागणी होत असून, त्यांचा तक्रार अर्ज घेवून पुढील कारवाई करावयाची असल्याचे सांगून सदर कारवाईमध्ये तपासी अधिकारी म्हणून त्यांची व पर्यवेक्षक अधिकारी म्हणून पोलीस निरीक्षक गोकूळ बोरसे यांची नेमणुक केल्याचे सांगून पोलीस निरीक्षक बोरसे यांना समक्ष बोलवून तक्रारदाराच्या तक्रारीप्रमाणे पुढील कारवाई करण्याचे आदेशित केले. त्यानंतर स.पो.आ उमा गवळी व पो.नि. गोकुळ बोरसे यांनी तक्रारदार हिच्याकडे सविस्तर चौकशी केली असता, तक्रारदार हिने तिचा स्व:हस्तलिखित तक्रार अर्ज लिहून दिला असल्याचे सांगून तक्रारदार यांनी दिलेला हस्तलिखित अर्ज आम्हास वाचण्यास दिला. तो पुढीलप्रमाणे ''तक्रारदार कु. कल्पिता संजय चौधरी वय २७ वर्षे रा. ७०४, बी विंग, शंखेश्वर पर्ल्स,आधारवाडी जेल रोड, कल्याण पश्चिम ४२१ ३०१ हया डी.बी.आर.ई इंडिया प्रायवेट लि ४६६, न्यु अपोलो सोसायटी, १४ वा रस्ता, ब्ल्यू टोकाई कॉफीजवळ, खार पश्चिम, मुंबई या कंपनीत लायसनिंग ऑफिसर म्हणून काम करते. तक्रारदार यांचे कंपनीला **''हाऊस ऑफ मसाबा''** यांचे फॅक्टरी लायसन्स बनवून देण्याचे काम मिळाल्याने कंपनीने दिनांक ०७/०६/२०२५ रोजी महानगरपालिका मुंबई चे पोर्टलवर ऑनलाईन ॲप्लिकेशन केले होते. महानगरपालिकेचे संबंधित के/पूर्व वॉर्ड येथून सदरचे लायसन्स मिळविण्याची प्रक्रिया करण्याची जबाबदारी तक्रारदार यांना डी.बी.आर.ई इंडिया प्रायवेट लि.या कंपनीमार्फत देण्यात आली होती.

सदर लायसन्सच्या अनुषंगाने दिनांक २०/०९/२०२५ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिका, के/पूर्व वॉर्ड, अंधेरी, मुंबई येथील श्री. अभिजित दिक्षित यांनी ''हाऊस ऑफ मसाबा'' फॅक्टरी येथे भेट दिली तेव्हा

तेथील कंपनीचे प्रतिनिधीने तक्रारदार यांना फोन करुन बोलविले. तेव्हा बृहन्मुंबई महानगरपालिकाचे अभियंता श्री. अभिजित दिक्षित यांनी काही कागदपत्रांचे पुर्तता करण्यास सांगितल्याने तक्रारदार यांनी संबंधित कागदपत्र पूरविल्या नंतर ते तेथून निघून गेले. त्यानंतर श्री. अभिजित दिक्षित यांनी फॅक्टरीचे प्रतिनिधी यांना फोन करुन ''आम्हास कोणी भेटावयास आलेले नाही'', असे बोलले. सदरची बाब फॅक्टरीचे प्रतिनिधी यांनी तक्रारदार यांना सांगितल्याने तक्रारदार कु. कल्पिता चौधरी हया दिनांक १४/१०/२०२५ रोजी १२:१५ वा चे सुमारास बृहन्मुंबई महानगरपालिका, के/पुर्व वॉर्ड, अंधेरी, मुंबई येथील बिल्डिंग ॲन्ड फॅक्टरी विभाग येथे जावून श्री. अभिजित दिक्षित यांची भेट घेतली असता, त्यांनी तक्रारदार यांना ''फॅक्टरी लायसन्स उपलब्ध करुन देण्याकरीता रुपये ७,००,०००/- इतक्या रक्कमेची मागणी करुन अगोदर ५० टक्के रक्कम म्हणजेच रु. ३,५०,०००/- इतकी रक्कम दयावी लागेल'' असे सांगितले. तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दिनांक १५/१०/२०२५ रोजी लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग येथे समक्ष हजर होवून लोकसेवक श्री. अभिजित दिक्षित हे लाच मागणी करत असल्याबाबत स्वःहस्तलिखित तक्रार अर्ज दिला.

स.पो.आ उमा गवळी यांनी तक्रारदार हिचा तक्रार अर्ज प्राप्त होताच लागलीच पो.ह कावले यांच्यामार्फतीने दोन शासकीय पंच नामे १) श्री. सोनल मोहनराव सातरकर, वय ३४ वर्षे, व्यवसाय . वरिष्ठ लिपिक, कार्यालयाचा पत्ता : प्रादेशिक परिवहन कार्यालय, मध्य मुंबई, राठी : खोली क. ३०५, अदित्य रुद्र बिल्डिंग, सेक्टर ४, करंजाडे, पनवेल ४१०२०६, २) श्री. साजन विजय केंगार, वय २९ वर्षे, व्यवसाय . लिपिक टंकलेखक, कार्यालयाचा पत्ता : कामगार आयुक्तालय, कामगार भवन, बांद्रा पूर्व, मुंबई, रा ठी : खोली क्र. ५०७, सिध्दीविनायक बिल्डिंग, गुरुनानक हॉस्पी, बांद्रा पूर्व, मुंबई ४०००५१ यांना पाचारण केले. पंच कार्यालयात हजर येताच त्यांना तक्रारदार महिलेची ओळख करुन देवून तिचे तक्रारीविषयी थोडक्यात हकिगत सांगून तक्रारदार हिचा स्वःहस्तलिखित तक्रार अर्ज पंचास वाचवयास देवून त्यावर समक्ष म्हणून स.पो.आ गवळी यांनी व पर्यवेक्षण अधिकारी पो.नि बोरसे तसेच दोन्ही पंचानी स्वाक्षरी केली व स.पो. आ गवळी यांनी सदरचा अर्ज त्यांचे ताब्यात घेतला. सदरवेळी लोकसेवक यांच्या कार्यालयीन कामकाजाची वेळ संपत असल्याने तक्रारदार, पंच व पोलीस पथक यांचे सर्वानुमते पडताळणी कारवाई दिनांक १६/१०/२०२५ रोजी करावयाचे ठरले.

दिनांक १६/१०/२०२५ रोजी तक्रारदार, पंच व पोलीस पथक असे लाप्रवि., मुंबई कार्यालयात आल्यानंतर सपोआ गवळी व पर्यवेक्षक अधिकारी पो.नि. बोरसे यांनी दोन्ही पंच, तक्रारदार यांना पडताळणी दरम्यान घ्यावयाच्या दक्षता व कारवयाची कारवाईबाबत सुचना दिल्या. त्यानंतर पंच, तक्रारदार व पोलीस पथक असे लाप्रवि., मुंबई कार्यालयातून पडताळणीकरीता शासकीय वाहनाने रवाना होवून लोकसेवक यांचे के/पूर्व वॉर्ड, अंधेरी, मुंबई या कार्यालयापासून काही अंतरावर थांबून पून्हा तक्रारदार व पंच क्र.१ यांना पथकातील तांत्रिक विभागाचे अमंलदार पो.ह यादव यांचेमार्फतीने व्हॉईस रेकॉर्डर ची माहिती देवून पडताळणी दरम्यान घ्यावयाच्या दक्षताबाबत सुचना देवून तक्रारदार यांना व्हॉईस रेकॉर्डर सूरु करुन स.पो.आ गवळी यांनी तक्रारदार यांनी परिधान केलेल्या कापडास उघडया डोळयाने दिसणार नाही अशा पध्दतीने लावला. त्यानंतर तक्रारदार व पंच क्र.१ हे दिलेल्या सुचनाप्रमाणे लोकसेवक यांच्या कार्यालयास जावून श्री. अभिजित दिक्षित यांची भेट घेवून परत पथक थांबलेल्या ठिकाणी आल्यानंतर स.पो.आ गवळी यांनी व्हाईस रेकॉर्डर बंद केले. पंचाच्यासमक्ष व्हाईस रेकॉर्डरमधील संभाषण ऐकता त्यामध्ये सर्वप्रथम लोकसेवक यांनी पंच क्र. १ विषयी '' ह. हे कोण आहे'' अशी विचारणा केली असता, तक्रारदार हिने पंच क्र. १ चा परिचय ''हे माझे सोबत काम करतात असिस्टंट आहेत'' असा करुन दिला. त्यानंतर लोकसेवक हे '' ठिक आहे मग आता आणलय तुम्ही? असे बोले असता...तक्रारदार हयांनी '' अ त्याच्या बद्दलच बोलायच होत थोड ते तुम्ही सात लाख बोललेलातना त्या दिवसी. थोड काही कमी-जास्त...असे विचारता लोकसेवक हे '' आज आम्ही सात केल ते पण पहिल दहा दहा चाललेल. म्हणुन आम्ही जास्ती बोललो सुध्दा नाही. कमी सांगितल उलट'' असे

बोलून तक्रारदार हिच्याकडुन सात लाख रुपये लाचेची मागणी केली. त्यावेळी तक्रारदार हया **" ठिक आहे मी येते अर्ध्या तासात घेऊन येते हा साडेतीन फिफ्टी पर्सेंट साडेतीन लाख मी पैसे घेऊन येते. थॅक्यू"** असे बोलून पंच क्र. १ यांचेसह पोलीस पथकाजवळ निघून आले असल्याचे संभाषणावरुन दिसून आले. काही वेळातच लोकसेवक यांचा तक्रारदार हिचे मोबाईलवर कॉल आल्याने लागलीच स.पो.आ गवळी यांनी व्हाईस रेकॉर्डर चालू केला व तक्रारदार हिने तिचा फोन स्पीकरवरती ठेवून बोलणे केले असता, त्यामध्ये लोकसेवक यांनी तक्रारदार हिस **"तुमचे मॅटर मी साहेबांसोबत डिस्कस केले असून, तुमची फाईल आम्ही फायर डिपार्टमेंटकडे पाठविलेली आहे, तुम्ही फायर डिपार्टमेंटकडून परवानगी घ्या, मी तुमचे काम करुन देतो"** असे बोलले. तेव्हा तक्रारदार हिने **" तुमच्या पैशांच काय मग सर"** अशी विचारणा करता लोकसेवक यांनी **"नाय नाय इकड काय तुम्हाला काय करायची आवश्यकता नाहीये. फायरच तुम्ही एन.ओ.सी घेऊन या आपण तुमच पॉझिटीवली करून टाकू काम. ठिक आहे"** झालेल्या संभाषणावरुन लोकसेवक यांना शंका आलेली असावी असे पोलीस व पंचाना वाटल्याने यानंतर लोकसेवक यांचा कॉल आल्यास त्याप्रमाणे पुढील कारवाई करण्यात येईल असे सर्वानुमते ठरले.

त्यानंतर दिनांक २९/१०/२०२५ रोजी तक्रारदार हिने स.पो.आ गवळी यांना दिनांक २९/१०/२०२५ रोजी दुपारी १३:२१ वा त्यांचे मोबाईलवर कॉल करुन तक्रारदार कु. कल्पिता चौधरी हिचे व्हॉटस्अप क्रमांक. ९३२४९२६४७९ यावर लोकसेवक श्री. अभिजित दिक्षित यांचे कार्यालयातील सहकारी महिला श्रीमती तृप्ती हिचा मोबाईल क्र. ८०८२०४९२५० यावरुन दिनांक २९/१०/२०२५ रोजी ११:४३ वा व्हॉटस्अप कॉल आला. त्यावेळी श्रीमती तृप्ती यांनी तक्रारदार हिस "फायर कार्यालतील कामाबाबत विचारणा करुन, दिनांक १६/१०/२०२५ रोजी श्री. अभिजित दिक्षित साहेबांना शंका आल्याने त्यांनी तुम्हाला परत भेटण्यास बोलविले नव्हते. असे सांगितले. तेव्हा तक्रारदार हिने **"मी कधी परत भेटावयास येवू"** असे विचारले असता, तृप्ती हिने **"मी साहेबांना विचारुन सांगते"** असे बोलून फोन ठेवला व काही वेळानंतर तृप्ती हिने तक्रारदार हिस व्हॉटस्अप कॉल करुन **"आधी ठरल्याप्रमाणे उदया ०५:०० वा घेऊन ऑफिस बाहेर आल्यानंतर साहेबांना कॉल करा"** असे सांगितले असुन तक्रारदार हि उदया दिनांक ३०/१०/२०२५ रोजी लोकसेवक यांना दयावयाच्या ३,५०,०००/- इतक्या रक्कमेसह अंधेरी पूर्व येथील पश्चिम द्रुतगती महामार्गावरील रस्त्यालगत साई सर्व्हिस सेंटर येथे येणार असल्याचे सांगितल्यावरुन स.पो.आ गवळी यांनी पंच व पोलीस पथकास संपर्क करुन दिनांक ३०/१०/२०२५ रोजी सकाळी १०:०० वा हजर राहण्यास सांगितले.

त्याप्रमाणे पंच व पथक हे आज दिनांक ३०/१०/२०२५ रोजी लाप्रवि., मुंबई कार्यालयात हजर राहिल्यानंतर दिनांक १६/१०/२०२५ रोजी पडताळणीवेळी पर्यवेक्षक अधिकारी म्हणून काम पाहिलेले पो.नि गोकूळ बोरसे हे कार्यालयात उपलब्ध नसल्याने मा. वरिष्ठांनी पर्यवेक्षण अधिकारी म्हणून काम पाहण्यास आम्हास आदेशित केले.

त्याप्रमाणे आम्ही, स.पो.आ गवळी, दोन्ही पंच व सापळा पथकास बोलवून सापळा कारवाई दरम्यान घ्यायवयाच्या दक्षता व करावयाची कारवाईबाबत सविस्तर सुचना देवून सापळा कारवाईकरीता लागणारे सर्व साधन सामुग्रीसह दोन शासकीय वाहनाने तक्रारदार हया अंधेरी पूर्व येथील पश्चिम द्रुतगती महामार्गावरील रस्त्यालगत साई सर्व्हिस सेंटर येथे तक्रारदार हिची भेट घेवून तिने लोकसेवक यांने मागणी केलेली रु. ३,५०,०००/- रक्कम आणलेली असल्याचे सांगितल्याने पथकातील अमंलदार पोह.साटम व पोह. सोनोने यांचेमार्फतीने लाचेच्या रक्कमेच्या झेरॉक्स काढण्यात आल्या. त्यानंतर स.पो.आ गवळी यांच्या आदेशाने पो. ह. भोसले यांनी पंच व तक्रारदार यांना ॲन्थ्रेसिन पावडरचे गूणधर्म समजावून सांगितले व लाच म्हणून वापरण्यात येणाऱ्या

। रक्कमेस ॲंथ्रेसिन पावडर लावून ती रक्कम पांढऱ्या रंगाच्या कॅरीबॅगमध्ये गुंडाळून सदर कॅरीबॅगला ॲंथ्रेसिन पावडर लावून ती कॅरीबॅग तक्रारदार यांच्या काळया व पांढऱ्या चेक्स रंगाची हॅन्डबॅग मध्ये टेवली. त्यानंतर स.पो.आ गवळी यांनी पोह.भोसले हे सापळा कारवाईमध्ये भाग घेणार नसल्याचे सांगितले.

स.पो.आ गवळी यांनी पंच क्र. २ व तक्रारदार यांना सापळा कारवाई दरम्यान घ्यायवयाच्या दक्षता व कारवयाची कारवाईबाबत सुचना देवून तक्रारदार हि लोकसेवक यांच्या कार्यालयाबाहेर पोहचताच स्वतः च्या मोबाईलवरुन लोकसेवक यांना कॉल करुन मोबाईल स्पीकरवर टेवून बोलणे करतील व लोकसेवक यांनी सांगितल्याप्रमाणे कारवाई करतील तसेच लोकसेवकांने पैशांची मागणी करताच त्यांच्याजवळील रक्कम काढून लोकसेवकास देतील व पथकास दिसेल अशा ठिकाणी येवून स्वतः च्या डोक्यावरील मोकळया असलेल्याा केसाचा अंबाडा पाडतील असा नियोजित इशार देतील अशा सुचना दिल्यात. त्यानंतर पोह यादव यांच्यामार्फतीने व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन स.पो.आ गवळी यांनी तक्रारदार हिने परिधान केलेल्या कापडास उघडया डोळयाने दिसणार नाही अशा पध्दतीने अडकविला. त्यानंतर तक्रारदार व पंच क्र. २ हे रिक्षाने लोकसेवक यांच्या के/पूर्व, अंधेरी, मुंबई या कार्यालयास जाण्यासाठी निघाले. त्यापाठोपाठ सापळा पथक पंच क्र. १ सह दोन वेगवेगळया रिक्षाने तक्रारदार हिचे रिक्षाच्या मागे काही अंतर टेवून निघालो. तक्रारदार हि पंच क्र. २ हयाचेसह बृहन्मुंबई महानगरपालिका, के/पूर्व वॉर्ड, अंधेरी, मुंबई या कार्यालयाचे प्रवेशव्दारासमोर रोडवर उतरुन काही वेळ मोबाईलव्दारे कॉल करुन पंच क्र. २ सह कार्यालयात प्रवेश केला त्यावेळी सापळा पथक कोणासही संशय येणार नाही अशा पध्दतीने कार्यालय परिसरात थांबून राहीले. तक्रारदार हि पहिल्या मजल्यावरील इमारत व कारखाने विभागात जावून काही वेळानंतर गेटजवळ येवून तिने मोकळे असलेल्या केसांचा अंबाडा बांधून लाच स्विकारल्याचे पूर्वनियोजित इशारा दिल्याने स.पो.आ गवळी, आम्ही व सापळा पथकाने लागलीच पंच क्र. २ यांचे सहाय्याने लोकसेवक श्री. अभिजित दिक्षित यांना १७:३२ वा ताब्यात घेतले. त्यांना त्याचे नाव व पत्ता विचारले असता, त्यांनी त्यांचे नाव अभिजित सुदाम दिक्षित वय ४३ वर्षे, धंदा नोकरी पद - दुय्यम अभियंता (नेमणुक : बृहन्मुंबई महानगरपालिका, के/पूर्व वॉर्ड, अंधेरी, मुंबई), राठी : फ्लॅट क्र. १००१, प्लॉट क्र. ८१, सतनाम विल्ला, सिंधी सोसायटी, चेंबूर, मुंबई असे सांगितले आहे.

तरी लोकसेवक श्री. अभिजित सुदाम दिक्षित यांनी तक्रारदार कु. कल्पिता संजय चौधरी हिस ती कामाकरीता असलेल्या डी.बी.आर.ई इंडिया प्रायवेट लि. तर्फे अर्ज केलेल्या ''हाऊस ऑफ मसाबा'' या गारमेंट फॅक्टरीचे` लायसन्स देण्याकरीता तक्रारदार हिचेकडे दिनांक १६/१०/२०२५ रोजी पडताळणी कारवाई दरम्यान पंचासमक्ष ७,००,०००/- रुपयाची लाचेची मागणी करुन त्यापैकी ५० टक्के रक्कम स्विकारण्याची तयार दर्शविली व त्याप्रमाणे आज दिर्नाक ३०/१०/२०२५ रोजी पंचासमक्ष रु. ३,५०,०००/- लाचेची रक्कम स्विकारताना रंगेहाथ ताब्यात घेण्यात आले म्हणून माझी लोकसेवक अभिजित सुदाम दिक्षित यांचेविरुध्द सरकारतर्फे कायदेशीर फिर्याद आहे.

माझी फिर्याद मी स्वत: संगणकावर मराठित टंकलिखीत केली असुन ती बरोबर व खरी आहे.

समक्ष,

(उमा गवळी)
स.पो.आ.
ला.प्र.वि. मुंबई

हा लिहून दिला,

(गणपत परचाके)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
बृहन्मुंबई विभाग, मुंबई.

तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ........ तात्काळ

Reasons for delay in reporting by the complainant/informant

चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील ( आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा ) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

..............................................................................................................................

10. चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ..............................................................

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ..............................................................

Unnatural / Accidental Death Case No., if any.

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत ( आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा ) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील नमूद ता. वे व ठिकाणी यातील तक्रारदार कु. कल्पिता संजय चौधरी ही लायसनिंग ऑफिसर म्हणून काम करीत असलेल्या DBRE या कंपनीने टाकलेल्या हाऊस ऑफ मसाबा या फँचाईजी परवाना देणेकामी यातील आलोसे अभिज्ञान दिक्षीत यांनी तक्रारदार हिचेकडे दि. १६/१०/२०२५ रोजी ७ लाख रुपयांची मागणी करून सदर लाचेच्या रकमेच्या ५०% रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविली व दि ३०/१०/२०२५ रोजी रु. २,५०,०००/- लाचेची रक्कम तक्रारदार हिचेकडून स्विकारताना आलोसे यांना रंगेहाथ पकडण्यात आले म्हणून गुन्हा नोंद.

13. **केलेली कार्यवाही** –1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा : स.पो.आ. उमा राजेश गवळी, ला.प्र.वि. मुंबई

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

..............................................................................................................................

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन .............................. जिल्हा .............. राज्य ..........

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O) .............. Rank .............. No. ............ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ..................................................

(3) Transferred to P. S. ..................................

District ................................... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.
(R.O.A.C.)

तक्रारदाराची सही व अंगठा

Signature and Thumb impression of the Complainant/Informant

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही

Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name उमा राजेश गवळी

पदनाम Rank सहाय्यक पोलीस आयुक्त

तपासिक अ. चा कोड क्र. ला.प्र.वि. मुंबई

Posting

1. न्यायालयास सादर केल्याची तारीख ..................................................

1. Date and time of submitted to the Court.

Code No. of I. O. ..................................................

| प्रत | 2 फिर्यादी, | 3. पोलीस अधीक्षक (संगणक), | 4. तपासिक अंमलदार, | 5. स्थळ प्रत. |
|---|---|---|---|---|
| Copy to | 2. Complainant, | 3. Supdt. of Police (Computer), | 4. Inv. Officer, | 5. Office Copy. |

Attachment to item 7 of First Information Report